# कृषी सल्ला (राहुरी विभाग)

## मिरची

- फुलकिड्यांच्या नियंत्रणासाठी कडुनिंबाची भुकटी ५० ग्रॅम (५% अर्क) किंवा कडुलिंबाचे तेल ५ मि.ली किंवा कडुनिंब आधारित फॉर्म्युलेशन १ मि.लि. (५ ईसी) ते ५ मि.लि. (०.०३ ईसी) प्रती लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.(अ‍ॅग्रिस्को शिफारस)
- पिकांवर कोळी (माइट्स) प्रादुर्भाव दिसून आल्यास इथिऑन (५० ईसी) १.५ मि.लि. किंवा प्रोपारगाइट (५७ ईसी) ३ मि.लि. प्रती लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.



मिरची पिकावरील फुलकिडे प्रादुर्भाव

## जनावरांचे व्यवस्थापन

- सध्या राज्यात सर्वदूर पाऊस चालू आहे. अशा पावसाळी वातावरणामध्ये जनावरांमध्ये विविध आजारांचा प्रादुर्भाव होत असतो. पावसाळ्यात जनावरांचे गोठे ओलसर राहून विविध जिवाणूजन्य किंवा विषाणूजन्य आजारांचा प्रसारही होतो. तो टाळण्यासाठी जनावरांचा गोठा सर्व बाजूने समतल करून घ्यावा. गोठ्यात कुठेही खड्डे असू नयेत, त्यामुळे गोठ्यात पाणी साचून राहणे किंवा ओलावा राहणे टाळता येईल. सर्व जनावरे कोरड्या जागेत व मोकळ्या हवेत ठेवावीत.
- विशेषतः पावसाळ्यात चराऊ जनावरांना सर्दी, न्यूमोनिया सारखे आजारही होत असतात. त्यामुळे लक्षणे दिसताच तात्काळ पशुवैद्यकाकडून उपचार करून घ्यावेत. अन्यथा एका आजारी जनावरांपासून अन्य निरोगी जनावरांमध्ये रोगाचा झपाट्याने प्रसार होण्याची शक्यता असते.
- पावसाच्या वेळी जनावरे बाहेर चरावयास नेऊ नयेत. पावसाळ्यात उगवणाऱ्या गवतामध्ये पाण्याचे प्रमाण अधिक व तंतुमय पदार्थांचे प्रमाण कमी असते. असे गवत जास्त प्रमाणात खाल्ले गेल्यास जनावरांची अन्नपचनाची क्रिया बिघडते व त्यांना हगवण लागते. त्यामुळे पावसाळ्यामध्ये चराऊ जनावरांच्या आहारात वाळलेल्या चाऱ्याचे प्रमाण तुलनात्मकरीत्या वाढवावे.
- या काळात दुधाळ जनावरांना कासदाह, घटसर्प व एकटांग्या या रोगांची लागण या काळात होण्याची शक्यता असते. त्यामुळे सर्व पशुपालकांनी आपल्या जनावरांना घटसर्प व एकटांग्या या आजारांचे लसीकरण पशुवैद्यकांच्या सल्ल्याने करून घ्यावे.
- कासदाह या रोगाचा अटकाव करण्यासाठी गोठ्यातील स्वच्छता हा एकमेव पर्याय आहे.

☎ ०२४२६- २४३२३९
प्रमुख, कृषी विद्या विभाग आणि ग्रामीण कृषी मौसम सेवा, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी